सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२५/ 470
दिनांक 17 FEB 2025

**प्रति,**
**प्राचार्य,**
सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : जेष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणुन साजरा करणेबाबत...**

**संदर्भ :** १. शासन परिपत्रक क्र.मभदि २०१८/प्रक्र१३/२०१८/भाषा-३ मंत्रालय दि.३ फेब्रुवारी २०१८
२. निवासी जिल्हाधिकारी,अमरावती यांचे पत्र कक्ष८/अका/संदर्भ/कावि९९/२०२५ दि.१२.०२.२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, जेष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिलेले असून त्यांचा जन्मदिन दि. २७ फेब्रुवारी हा **"मराठी भाषा गौरव दिन"** म्हणून साजरा करण्याबाबत शासन परिपत्रक क्र.मभदि २०१८/प्रक्र१३/२०१८/भाषा-३ मंत्रालय दि.३ फेब्रुवारी २०१८ नुसार शासनाकडून सूचना आहे. सोबत शासन परिपत्रक संलग्नित करण्यात येत आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे.

सदर शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

**सहपत्र** : वरिलप्रमाणे

**(मनोज म.अंधारे)**
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती

**प्रत** : **प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांन संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Nivedan application


महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,अमरावती

कॅम्प रोड, अमरावती -४४४६०२

☎:-०७२१-२६६२०२५ E-Mail ID :- rdc.amaravati@gmail.com

☎:-०७२१-२६६२४९३ Website:- https://amravati.gov.in


क्र.कक्ष८/अका/संदर्भ/कावि ७७/२०२५ दि. १२/०२/२०२५

183 प्रति,

१. सहसंचालक (उच्च शिक्षण) अमरावती

सहसंचालक २. उपसंचालक (तंत्रशिक्षण) अमरावती

३. उपसंचालक (माध्यमिक/प्राथमिक) अमरावती

४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक) अमरावती

५. नगर पालिका प्रशासन अधिकारी जि.का.अमरावती

६. शिक्षणाधिकारी महानगरपालिका,अमरावती

विषय :: जेष्ठ कवी वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७ फेबुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणुन साजरा करणेबाबत

संदर्भ ::- शासन परिपत्रक क्र.मभदि२०१८/प्रक्र१३/२०१८/भाषा-३मंत्रालय मुंबई दि.०३ फेब्रुवारी २०१८

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने जेष्ठ कवी वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून त्यांचा जन्मदिन दि. २७ फेबुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्याचा सूचना शासनाकडुन आहे. सदर परिपत्रक पुढील योग्य कार्यवाहीकरिता यासोबत पाठविण्यात येत आहे.

उक्त शासन परिपत्रकात दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहपत्र :: शासन परिपत्रक

(अनिल भटकर)

निवासी उपजिल्हाधिकारी अमरावती

सहसंचालक, तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र. 806 दिनांक 14/02/2025

8/14/2

ज्येष्ठ कवी वि.वा शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः मभादि-२०१८/प्र.क्र.१३/२०१८/भाषा-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**तारीख: ०३ फेब्रुवारी, २०१८.**

वाचा :- मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.मभादि-१०१२/प्र.क्र.८८/२०१२/भाषा-३, दिनांक २१ जानेवारी, २०१३.

परिपत्रक :-

वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिन "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याच्या सूचना यापूर्वी दिनांक २१ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयास अनुसरुन राज्यातील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुख यांना मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी पुढील विविध उपक्रम आयोजित करुन समारंभपूर्वक "मराठी भाषा गौरव दिन" सोहळा साजरा करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

उपक्रमांची सूची :-

१) 'मोबाईलवर मराठी' :-

- बोलू तसे टंकलेखन करणाऱ्या (स्पीच-टु-टेक्स्ट) लिपिकार या मुक्त ॲपच्या माध्यमातून मोबाईलवर मराठीतून टंकलेखन आणि स्वरचक्र या फक्त टंकलेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या मुक्त ॲपच्या माध्यमातून मराठीतून मोबाईलवर टंकलेखन करणे.
- लिपीकारसारखे मराठी वॉईस टायपिंग कीबोर्ड, स्पीचनोटस्, हियर टु रीड मराठी, वॉइस टु टेक्स्ट, मराठी की बोर्ड असे ॲप्सचे अनेक पर्याय "बोलू तसे मराठी टंकलेखन" करण्यासाठी उपलब्ध आहेत.

- स्वरचक्रप्रमाणे स्पर्श, पाणिनी, गुगल इंडीक असे ॲप्राचे अनेक पर्याय मराठी टंकलेखन करण्यासाठी उपलब्ध आहेत. मराठी टंकलेखनासाठी याचा वापर करावा.
- मराठी विश्वकोश आता मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे. तरी भाषा गौरव दिनाच्या औचित्याने सदर ॲपचा वापर / प्रसार होईल याद्दष्टीने महाविद्यालये, विद्यार्थी, शिक्षक यांनी प्रयत्न करावेत.

२) 'संगणकावर मराठी' :-

महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील मुख्य पानावरील चलतचित्र पहावे. त्यानुसार आपल्या संगणकावर युनिकोड मराठी कार्यान्वित करण्याची कृती करा.

३) 'शाळा व महाविद्यालयांमध्ये एकाच वेळी मराठी अभिमान गीत गायन' :-

कवी सुरेश भट यांनी लिहिलेल्या व संगीतकार कौशल इनामदार यांनी संगीतबद्ध केलेल्या "लाभले आम्हास भाग्य" या गीताचे समूह गायन करा. (सकाळ सत्र - सकाळी ११.०० वाजता व दुपार सत्र - दुपारी ४.०० वाजता)

४) मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या द्दष्टीने महत्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रम आयोजित करावे,

५) सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने राज्यभर ग्रंथप्रदर्शन / ग्रंथोत्सव / ग्रंथदिंडी आयोजित करणे,

६) शाळा / महाविद्यालय / शासकीय व निमशासकीय कार्यालये / खाजगी संस्थांमध्ये विविध स्तरांवर मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीविषयक विविध प्रकारच्या स्पर्धा (निबंध, वक्तृत्व इ.) आयोजित करणे,

७) न्यायव्यवहार, शासन प्रशासन, प्रसार माध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने , चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन,

८) मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शासनाच्या विविध उपक्रमांना प्रसिध्दी देणे,

९) आकाशवाणी व दूरदर्शनवरुन सादर करण्यात येत असलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या प्रायोजित कार्यक्रमामध्ये मराठी भाषा विषयक मान्यवरांच्या मुलाखती, परिसंवाद आयोजित करणे,

१०) मराठी भाषा / साहित्य / कोश वाङ्मय या विषयांवर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन तसेच तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतींचे आयोजन करणे,

११) प्रसारमाध्यमे तसेच प्रशासनात मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन करणे,

१२) युनिकोडप्रणित मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करणे,

१३) समाजप्रसार माध्यमांतील (सोशल मीडिया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे यांचे आयोजन करणे,

१४) मराठी विकीपिडीयावर लेख / माहिती लिहिण्यासाठी शाळा / महाविद्यालये / शासकीय कार्यालये यामध्ये कार्यशाळा भरविणे,

१५) कुसुमाग्रज व इतर सुप्रसिद्ध थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन करणे,

१६) दिवंगत साहित्यिकांच्या जन्मगावी / कर्मभूमी येथे स्थानिक शाळांच्या / ग्रंथालयांच्या मदतीने शाळा / ग्रंथालये / वाचनालये येथे स्थानिक शिक्षण संस्था / महाविद्यालये यांचेमार्फत दिवंगत साहित्यिकांचे स्मरण करुन त्यांच्या गौरवार्थ कार्यक्रमाचे आयोजन करणे,

१७) मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन करणे,

१८) बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन करणे (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ.),

१९) शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती याबाबतच्या स्पर्धांचे आयोजन करणे,

२०) म्हणी, वाक्प्रचार, प्राचीन शब्द यांची व्युत्पत्ती - या विषयांवर रंजक व्याख्याने / सादरीकरणे,

२१) मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन करणे,

२२) मराठी कविता, प्रसिद्ध उतारे, मराठी भाषा विषयक घोषवाक्ये यांचे भित्तीचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन करणे,

२३) मोडी लिपी चे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन करणे,

२४) मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या नि:स्पृह व्यक्ती व त्यांनी निर्माण केलेल्या संस्थाना किंवा प्रकल्पांना भेट देणे,

२. सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपआपल्या विभागातील कार्यक्षेत्रातील संबंधितांचे सहकार्य घेऊन हा सोहळा पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सहभागी करुन घ्यावे.

३. सदर उपक्रमांकरीता होणारा खर्च, प्रत्येक वित्तीय वर्षात संबंधित लेखाशिर्षाखाली कार्यालयीन खर्चासाठी मंजूर होणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०२०३१५२७३३१९३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अपर्णा अ. गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४. मा.सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई,
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई, (दूरदर्शन / आकाशवाणी / वृत्तपत्रे / भित्तीपत्रके या माध्यमातून विस्तृत प्रसिध्दी देण्यासाठी),
१२. सर्व मंत्रालयीन विभाग (त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना सूचना देण्याबाबत),
१३. सर्व विभागीय आयुक्त,
१४. सर्व जिल्हाधिकारी,
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६. भाषा संचालक, भाषा संचालनालय, बांद्रा, मुंबई,
१७. अध्यक्ष / सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
१८. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
१९. संचालक / प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
२०. मराठी भाषा विभाग / सर्व कार्यासने,
२१. निवड नस्ती (भाषा-३).